# शिरोळ तालुक्यातील गुंतवणूकदारांची पाचशे कोटी रूपयांची फसवणूक

## गुंतवणुकीची रक्कम परत मागितल्यावर एजंट गायब

केसरी वृत्तसेवा

**जयसिंगपूर :** गुंतवणुकीच्या रकमेवर जादा परतावा देण्याच्या आमिषाने शिरोळ तालुक्यात गुंतवणूकदारांची ५०० ते ५५० कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. यातून जयसिंगपूर शहरासह तालुक्यातील आठ ते दहा एजंट गायब झाले आहेत. यामुळे गुंतवणूकदारांचे धाबे दणाणले असून अनेक गुंतवणूकदारांनी न्यायालयाच्या मार्गाचाही अवलंब केला आहे. एका जयसिंगपूर शहरात सुमारे दिडशे कोटींची फसवणूक झाल्याचे सांगण्यात येत आहे.

जादा परताव्याच्या आमिषाने शहरासह तालुक्यातील अनेक जण शेअर मार्केटच्या साखळीतील एजंटांना बळी पडले आहेत. सुरुवातीच्या काळात शहरातील शासकीय नोकरदार, व्यावसायिक आणि व्यापाऱ्यांवर लक्ष केंद्रित केलेल्या शेअर मार्केटमधील एजंट आणि अलीकडच्या काळात आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्या गावातील सावज हेरले आहेत. मोठमोठे सेमिनार घ्यायचे, गुंतवणूकदारांवर इम्प्रेशन पाडायचे आणि त्यांना लाखो रुपये गुंतवणूक करण्यास भाग पाडायचे. यासाठी एक मोठी साखळी कार्यरत आहे. मोठी रक्कम गोळा झाल्यानंतर नंतरच्या काळात कोणताही परतावा द्यायचा नाही. गुंतवणूकदारांचा ससेमिरा पाठीमागे लागल्यानंतर सरळ गायब व्हायचे हे धोरण एजंटानी अवलंबले आहे. यामुळे मोठी गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांनी चांगलाच धसका घेतला आहे.

अशा प्रकरणांमधून अनेक वादाचे प्रसंग उद्भवत आहेत. गुंतवणूकदारांची फसवणूक केलेल्या एजंटांनीच गुंतवणूकदारांना अडचणीत आणण्याचे उद्योग सुरू केले आहेत. पैसे हडप करण्याच्या अनेक क्लुप्त्या एजंट लढवत आहेत, तर काही गुंतवणूकदारांच्या पाठपुराव्याला कंटाळून एजंटांनी गावच सोडले आहे.

### शिक्षकाची नोकरी सोडून बनला एजंट

शिरोळ येथील एका शिक्षकाने लाखमोलाची नोकरी सोडून शेअर मार्केटमध्ये काम करण्यास सुरुवात केली. परिसरातील गुंतवणूकदारांकडून जवळपास सात कोटी रुपये गोळा केले आहेत.

जादा कर्तव्याच्या आमिषाने माझ्यासह अनेकांनी मोठी रक्कम गुंतवली. सुरुवातीला चांगला मोबदला दिला. नंतरच्या काळात खरे रंग दाखवण्यास सुरुवात झाली. एजंट गायब झाल्याने माझ्यासारख्या अनेकांची कोट्यवधी रुपयांची रक्कम अडकून पडली आहे. आम्ही एकत्रितरित्या लवकरच न्यायप्रविष्ट मार्गाने लढा देणार आहोत.

**– एक गुंतवणूकदार,** जयसिंगपूर

फसवणुकीबाबतच्या तक्रारींवर गांभीर्याने कारवाई करू. फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांनी पोलिसांकडे तक्रार द्यावी. तक्रारीची शहानिशा करून योग्य ती कारवाई करू.

**– डॉ. रोहिणी सोळंके** (उपविभागीय पोलीस अधिकारी, जयसिंगपूर)

### आर्थिक दृष्ट्या सक्षम गावांवर लक्ष

शिरोळ तालुक्यात जयसिंगपूरनंतर आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्या गावांकडे शेअर मार्केटमधील एजंटानी लक्ष केंद्रित केले. गावातील मोठ्या शेतकऱ्यांना हेरून त्यांनाही योजनेत ओढल्याचा प्रयत्न केल्याचे उघडकीस येत आहेत.

**शिक्षक, डॉक्टर, व्यावसायिक बळी**

शिरोळ तालुक्यात कोट्यावधी रुपयाची फसवणूक झाली असताना यामध्ये खास करून शिक्षक, प्राध्यापक, पोलीस, डॉक्टर, बँक कर्मचारी, विमा प्रतिनिधी, व्यावसायिकांची संख्या अधिक आहे. फसलेले सध्या परिस्थितीवर लक्ष ठेवून असून एकत्रितरित्या प्रयत्न करून पैसे वसुलीचा प्रयत्न सुरू आहे.

## गुंतवणूकदारांना सावधानतेचा इशारा

केसरी वृत्तसेवा

**कोल्हापूर :** एक्सचेंजच्या असे निदर्शनास आले आहे की, ‘विवेक’ नावाची आणि ९०३९११६७५५ हा मोबाइल क्रमांक वापरणारी व्यक्ती ट्रेडिंगसाठी खाते हाताळण्यासाठी गुंतवणूकदारांना त्यांचे लॉग इन आयडी, पासवर्ड मागत आहे. गुंतवणूकदारांना अशा प्रकारची कोणतीही योजना देऊ करणाऱ्या, शेअर बाजारातून खात्रीशीर परताव्यांची हमी देणारी व्यक्ती, संस्थेसह व्यवहार न करण्याचा सल्ला एक्सचेंजने दिला आहे. सदर व्यक्ती संस्था राष्ट्रीय शेअर बाजाराच्या कोणत्याही नोंदणीकृत सदस्याची अथोराइज्ड पर्सन किंवा सदस्य म्हणून नोंदणीकृत नाही, याचीही नोंद घ्यावी.

## कराओंके गीत गायन स्पर्धेत अश्विनी पोतदार प्रथम

केसरी वतसेवा

**इचलकरंजी :** सहकार महर्षि कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या वाढदिवसानिमित्त स्वरांश कराओके गीत संगीत व शाहिरी संस्था यांच्या वतीने घेण्यात आलेल्या कराओके गीत गायन स्पर्धेत अश्विनी पोतदार यांनी प्रथम क्रमांक मिळविला. तर मुकुंद गणपती चौगुले आणि साजिद मतवाल यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला.

समाजवादी प्रबोधिनी येथील स्पर्धेत ६० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. ज्येष्ठ नागरिक प्रताप जाधव, परिक्षक गौरी पाटील, मनीष आपटे, किशोर धनवडे, अभयकुमार पोतदार आणि शाहीर संजय जाधव आदी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पुजन झाले. स्वागत प्रताप जाधव यांनी केले. स्पर्धेत मानसी घोरपडे, शफिक मुल्ला, दगडू कांबळे, विवेक कुंभार, केतकी पाटील, स्वाती सुतार आणि अपूर्वा जावळे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी आमदार प्रकाश आवाडे, डॉ. राहूल आवाडे, प्रकाश दत्तवाडे, अमितकुमार खोत यांचे सहकार्य लाभले. सीमा मुळे यांनी सूत्रसंचलन केले.

**जाहीर नोटीस**

क्र./आरटीएस/अपिल/६२/२०२४
उपविभागीय अधिकारी कार्यालय,
गडहिंग्लज विभाग, गडहिंग्लज
दिनांक :–१४/०६/२०२४

१) श्री. रावसाहेब दत्तात्रय गटकर,
रा. शिप्पूर तर्फे नेसरी, ता. गडहिंग्लज
जि. कोल्हापूर **– अपिलार्थी**

**विरुध्द**

६) विराज श्रीकांत शिंदे, रा. घर नं. ७६७,
शांता सदन साई मंदिर जवळ कळंबा कोल्हापूर
७) उज्वला निळकंठ शिंदे
८) पल्लवी निळकंठ शिंदे
९) पुजा निळकंठ शिंदे,
तिघे रा. घर नं.–१४५२, बी वॉर्ड,
मंगळवार पेठ कोल्हापूर
११) प्रिती किरण पारखे
१२) रविंद्र पंडीतराव शिंदे,
दोघे रा. घर नं. ७६७, शांता सदन साई मंदिरजवळ,
कळंबा कोल्हापूर **– प्रतिवादी**

मौजे नेसरी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर येथील दावा जमिन गट नंबर १८२/२ या दावा जमिनीबाबत मंडळ अधिकारी नेसरी यांचेकडील क्र./आरटीएस/तक्रार/एसआर/०४/२०२३ चे कामी दिनांक २५/०९/२०२३ रोजी पारीत केले आदेशा विरुध्द अपिल दाखल केले आहे. सदर अपिलाचे कामी विलंबाचे मुद्यावर गडहिंग्लज प्रांत कार्यालय गडहिंग्लज येथे दिनांक २६/७/२०२४ रोजी सुनावणी नेमणेत आली आहे. तरी वरील नेमले तारखेस ठिक ११.०० वाजता समक्ष अगर वकीला मार्फत हजर राहून म्हणणे द्यावे. नेमले तारखेस गैरहजर राहिलेस अगर गैरहजर राहून मुदत अर्ज पाठविलेस तो अर्ज नामंजूर करून खटल्याचे कामी एकतर्फी निकाल दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

**(मल्लिकार्जुन माने)**
उपविभागीय अधिकारी
गडहिंग्लज विभाग, गडहिंग्लज

**जाहीर नोटीस**

जन्म–मृत्यू नोंद अर्ज ९१०/२०२४

**जत येथील मे. उपविभागीय अधिकारीसो जत यांचे न्यायालयात**

सौ. सुलाबाई रत्नापा लोखंडे, रा. खिलारवाडी, ता. जत, जि. सांगली **– अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामविकास अधिकारी तथा जन्म, मृत्यू
व विवाह नोंदणी निबंधक ग्रामपंचायत, खिलारवाडी, ता. जत, जि. सांगली **– जाबदार**

ज्याअर्थी मौजे खिलारवाडी, ता. जत, जि. सांगली पंचक्रोशितील तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

यातील अर्जदार यांची स्वतः सौ. सुलाबाई रत्नापा लोखंडे यांची जन्म दि. ०१/०१/१९७३ मौजे खिलारवाडी, ता. जत, जि. सांगली येथे रोजी राहते घरी जन्म झालेला आहे. मात्र सदर जन्माची नोंद अनावधानाने ग्रामपंचायत खिलारवाडी, ता. जत यांच्या कडील जन्म–मृत्यू रजिस्टर नोंद केली नाही. त्यामुळे यातील अर्जदार यांनी जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) व महाराष्ट्र जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम २००० मधील नि. ९ (३) प्रमाणे व तरतुदीप्रमाणे अर्जदार यांची स्वतः सौ. सुलाबाई रत्नापा लोखंडे यांची जन्म दि. ०१/०१/१९७३ रोजी जन्म नोंद ग्रामपंचायत खिलारवाडी, ता. जत कडील जन्म–मृत्यू रजिस्टरला होणेबाबत ग्रामविकास अधिकारीसो खिलारवाडी यांना आदेश होण्यासाठी सदरचा अर्ज न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी त्याबाबत कोणाची कसलेही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस जाहीर झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अथवा नेमले दिनांक २६/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा या मे. कोर्टात स्वतः अगर कायदेशिर प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकत घ्यावी. मुदतीत कोणाची हरकत न आलेस अर्जदार यांची स्वतः सौ. सुलाबाई रत्नापा लोखंडे यांची जन्म दि. ०१/०१/१९७३ रोजी जन्म झाला आहे अशी जन्म तारीख नोंद ग्रामपंचायत खिलारवाडी कडील जन्म–मृत्यू रजिस्टरला नोंद होणेसाठी ग्रामविकास अधिकारीसो खिलारवाडी यांना योग्य तो आदेश करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. आज दिनांक ११/०७/२०२४ रोजी मे. कोर्टाच्या सही, शिक्क्यानिशी दिली जाहीर नोटीस असे.

शिक्का

**(अजयकुमार नष्टे)**
उपविभागीय अधिकारी
जत उपविभाग, जत

**जाहीर नोटीस**

जन्म–मृत्यू नोंद अर्ज ९०९/२०२४

**जत येथील मे. उपविभागीय अधिकारीसो जत यांचे न्यायालयात**

सौ. सुलाबाई रत्नापा लोखंडे, रा. खिलारवाडी, ता. जत, जि. सांगली **– अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामविकास अधिकारी तथा जन्म, मृत्यू
व विवाह नोंदणी निबंधक ग्रामपंचायत, खिलारवाडी, ता. जत, जि. सांगली **– जाबदार**

ज्याअर्थी मौजे खिलारवाडी, ता. जत, जि. सांगली पंचक्रोशितील तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

यातील अर्जदार यांची मुलगी येसाबाई रामा शिंदे यांचा मृत्यू दि. १९/०५/२००० मौजे खिलारवाडी, ता. जत, जि. सांगली येथे रोजी राहते घरी मृत्यू झालेला आहे. मात्र सदर मृत्युची नोंद अनावधानाने ग्रामपंचायत खिलारवाडी, ता. जत यांच्या कडील जन्म–मृत्यू रजिस्टर नोंद केली नाही. त्यामुळे यातील अर्जदार यांनी जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) व महाराष्ट्र जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम २००० मधील नि. ९ (३) प्रमाणे व तरतुदीप्रमाणे अर्जदार यांची मुलगी येसाबाई रामा शिंदे यांचा मृत्यू दि. १९/०५/२००० रोजी मृत्यू नोंद ग्रामपंचायत खिलारवाडी, ता. जत कडील जन्म–मृत्यू रजिस्टरला होणेबाबत ग्रामविकास अधिकारीसो खिलारवाडी, यांना आदेश होण्यासाठी सदरचा अर्ज न्यायालयाकडे दाखल केला आहे.

त्याअर्थी त्याबाबत कोणाची कसलेही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस जाहीर झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अथवा नेमले दिनांक २६/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. या मे. कोर्टात स्वतः अगर कायदेशिर प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकत घ्यावी. मुदतीत कोणाची हरकत न आलेस यांची मुलगी येसाबाई रामा शिंदे यांचा मृत्यू दि. १९/०५/२००० रोजी मृत्यू झाला आहे अशी मृत्यू तारीख नोंद ग्रामपंचायत खिलारवाडी कडील जन्म–मृत्यू रजिस्टरला नोंद होणेसाठी ग्रामविकास अधिकारीसो खिलारवाडी, यांना योग्य तो आदेश करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. आज दिनांक ११/०७/२०२४ रोजी मे. कोर्टाच्या सही, शिक्क्यानिशी दिली जाहीर नोटीस असे.

शिक्का

**(अजयकुमार नष्टे)**
उपविभागीय अधिकारी
जत उपविभाग, जत

**एल&टी फायनान्स लिमिटेड**
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
**नोंदणीकृत कार्यालय:** एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** सांगली

L&T Finance

**तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव**

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 [54 चा 2002] अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक ई–लिलावाद्वारे'' ''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा ई–लिलाव करीत आहेत.

| कर्जदार आणि सह–कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 30.05.2024 नुसार | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. रोहित किशोर कुलकर्णी 2. रसिका रोहित कुलकर्णी 3. अनुराधा किशोर कुलकर्णी 4. गौरी कुलकर्णी (मृत सहकर्जदार राहुल किशोर कुलकर्णी यांचे कायदेशीर वारस म्हणून) 5. मृण्मयी कुलकर्णी (मृत सहकर्जदार राहुल किशोर कुलकर्णी हिच्या संरक्षक गौरी कुलकर्णी तर्फे कायदेशीर वारस म्हणून) | मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल: फ्लॅट क्रमांक A–1, 81.56 चौ. मीटर बिल्ट अप आणि 102.59 चौ. मीटर आदित्य सहनिवास शासकीय वसाहत/विद्या कॉलनी, राधाकृष्ण आणि गजानन महाराज मंदिराजवळ, इमारतीच्या पहिल्या मजल्यावर सुपर बिल्ट अप एरिया, वसलेले, असलेले आणि आर.एस.आर. क्रमांक 160/1 वर आहे, तसेच प्लॉट क्रमांक 4, जो सांगली, मिरज, कुपवाड, महानगरपालिका, ता – मिरज, जिल्हा – सांगली आणि सब रजिस्टर मिरज, महाराष्ट्र भारत 416416 च्या कार्यक्षेत्रात देखील आहे. | KOHHL18 000214 & KOHHL18 000215 | 15 मे 2024 | रु. 2,78,082 | रु. 48,31,667.55 | रु. 27,80,820 | सर्व कामकाजाच्या दिवशी आधी वेळ ठरवून | 30.07.2024 सकाळी 10 ते संध्याकाळी 5:30 |

| सीमा | | |
|---|---|---|
| | पूर्व | आर. एस. क्रमांक 161 |
| | पश्चिम | रस्ता |
| | उत्तर | फ्लॅट क्रमांक A–2 |
| | दक्षिण | प्लॉट क्र. 3 |

**सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम**

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई–लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई–लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई–लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई–लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **29.07.2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई–लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई–लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **30.07.2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **31.07.2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुर्दीनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहितीसाठी, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना संपर्क करावा म्हणजे मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहिती, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना म्हणजे **''नाव – अशोक लब्दे, संपर्क क्रमांक 9637764444, ऑफिस: एल&टी फायनान्स लि. – ऑफिस क्रमांक 301, तिसरा मजला, जेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे – 411005, आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लि. – ऑफिस: 6वा मजला, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीस शोरुमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – 400 098.''** या पत्त्यावर संपर्क साधावा. ई–लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी बोली/प्रस्ताव स्विकारू/नाकारू/बदल/रद्द करु शकतात किंवा कोणतेही कारण न देता आणि पूर्वसूचना न देता ई–लिलावपुढे नेऊ शकतात.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई–लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह–कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई–लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह–कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

स्वाक्षरी/–
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

**दिनांक:** 13.07.2024
**ठिकाण:** सांगली

**जाहीर नोटीस**

आमचे आशिल विटा मर्चंट को–ऑप. बँक शाखा – गव्हर्मेंट कॉलनी सांगली तर्फे शाखाधिकारी यांनी दिली माहिती, दाखविलेल्या कागदपत्रावरून व दिले अधिकारावरून प्रस्तुतचे या जाहीर नोटीसीद्वारे सर्व वित्तीय संस्था, राष्ट्रीयकृत बँका व तमाम लोकांना कळविणेत येते की,

१) **मिळकतीचे वर्णन –** जिल्हा सांगली तालुका व पोट तुकडी मिरज पैकी गाव मालगाव येथील गट नं. २११७ याचे एकूण क्षेत्र ०.७९ आर यामधील अशोक नारायण घारे व वसंत नारायण घारे यांचे मालकीची प्रत्येकी क्षेत्र ०.०१.५०, आकार रु. ०.०१ पै (एकूण क्षेत्र ३ आर) या दोन्ही मिळकती एकमेकास लगत असून त्याचे एकत्रीत चतुःसीमा खालीलप्रमाणे :– पूर्वेस – महालिंग माळी यांची खुली जागा. दक्षिणेस – महादेव शिंदे यांची खुली जागा. पश्चिमेस – राजेश घाडगे यांची घर मिळकत. उत्तरेस – भूजगोंडा बाळगोंडा पाटील यांची घर मिळकत.

येणेप्रमाणे चतुःसीमेतील मिळकत तदंगभूत वस्तूसह इजमेंटचे राईटस सह.

२) वर कलम १ नमूद केलेली मिळकत ही श्री. अशोक नारायण घारे व वसंत नारायण घारे, दोघे रा. मालगाव, ता. मिरज, जि. सांगली यांचे मालकीची असून सदर ७/१२ रेकॉर्ड सदरी त्यांचे नावाची नोंद फेरफार न. ५५५८ ने झालेली आहे. वर कलम १ मधील मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजा विरहीत असलेची खात्री उभयता मिळकत मालक यांनी आमचे आशिल बँकेस दिली आहे. सदर वरील मिळकतीचा कर्जाचा प्रस्ताव आमचे आशिल बँकेकडे कलम १ मधील मिळकत मालक वसंत घारे यांचे चिरंजीव श्री. अभय वसंत घारे, रा. मालगाव यांनी दिला आहे. सदर कर्जास जामीनदार या नात्याने वर कलम १ मधील मिळकत मालक यांनी सदरची मिळकत कर्जास तारण देणेचे निश्चित केले असून आमची आशिल बँक सदर कलम १ मधील मिळकत कर्जास तारण घेऊन कर्ज देणेचे विचाराधीन आहे. याकरिता सदरची जाहीर नोटीस देणेत येत आहे.

३) सबब या जाहीर नोटीसीने सर्वांना असे कळविणेत येते की, कलम १ मधील मिळकतीवर अन्य कोणतेही नोंद, विनानोंद, करार, लीज, लोन, भाडेकरार, भाडेपट्टा, तारण गहाण, शासकीय व निमशासकीय बँका यांचे बोजे, कोर्ट केसेस, मिळकत तबदील होईल असे कोणतेही व्यवहार झाले असलेस सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाच्या आत खाली दिले पत्त्यावर कागदोपत्री लेखी आम्हास कळवावे व खात्री पटवून द्यावी. नोटीसीत दिले मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आलेस आमची आशिल बँक मुदतीनंतर इतर आवश्य त्या कागदपत्रांचे पूर्ततेनंतर वर कलम १ मधील मिळकत कर्जास तारण घेऊन कर्ज देणेबाबत योग्य ती पूर्तता पूर्ण करतील. तद्नंतर आमचे आशिल बँकेचा सदर मिळकतीवर अग्रहक्काने कायदेशीर बोजा निर्माण होईल. मुदतीनंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही यांची नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

सांगली
तारीख – १०/७/२०२४

**विजय द. सुतार – ॲडव्होकेट**
ऑफिस – १००/१, वखारभाग, सांगली, ता. मिरज,
जि. सांगली. मो. न. ९४०५५५६०३६

**जाहीर नोटीस**

आमचे आशिल विटा मर्चंट को–ऑप. बँक शाखा – गव्हर्मेंट कॉलनी सांगली तर्फे शाखाधिकारी यांनी दिली माहिती, दाखविलेल्या कागदपत्रावरून व दिले अधिकारावरून प्रस्तुतचे या जाहीर नोटीसीद्वारे सर्व वित्तीय संस्था, राष्ट्रीयकृत बँका व तमाम लोकांना कळविणेत येते की,

१) **मिळकतीचे वर्णन –** जिल्हा सांगली तालुका व पोट तुकडी सांगली पोट तुकडी व ता. तासगाव पैकी तासगाव येथील म्युन्सिपल हद्दीतील घर व खुली जागा पुढीलप्रमाणे १) सि.स.नं. २एल पैकी वाड्याचे दक्षिण बाजूची प्रत १ ची लोड बेअरिंगची दुमजली कौलारू इमारत खुली जागा यासह. याचे क्षेत्र ११३.८४ चौ.मी. यासी चतुःसीमा :– पूर्व – बाबू खाजू सावंत यांची मिळकत. दक्षिणेस – नगरपालिका रस्ता. पश्चिम – वरील नं. पैकी प्रत २ ची मिळकत. उत्तरेस – वरील नं. पैकी प्रत नं. ३ ची मिळकत. येणेप्रमाणे मिळकत लाईट कनेक्शन व पाणी कनेक्शन हक्कासह. २) सि.स.नं. २ एल पैकी प्रत नं. २ ची खुली जागा याचे क्षेत्र १८.५८ चौ.मी. यासी चतुःसीमा :– पूर्व – वरील प्रत नं. १ ची मिळकत. दक्षिणेस – रस्ता. पश्चिमेस – जनार्दन अरूण खराडे. उत्तर – राहिलेली बुरुजाची जागा. ३) सि.स.नं. २ एल पैकी प्रत नं. ३ ची खुली जागा. याचे क्षेत्र १६.२६ चौ.मी. यासी चतुःसीमा :– पूर्व – धोंडीराम व बाबुराव सावंत. दक्षिण – प्रत नं. १ ची घर व खुली जागा. पश्चिम – प्रत नं. २ ची जागा. उत्तर – खराडे व राहिलेली जागा. येणेप्रमाणे सिटी सर्वेचे इजमेंट हक्कासह. वरील प्रत नं. १, २, ३ याप्रमाणे घर व खुल्या जागेचे एकूण क्षेत्र १४८.६८ चौ.मी. येणेप्रमाणे घर व खुली जागा, दगड माती, तदंगभूत वस्तूसहची मिळकत.

२) वर कलम १ यात नमूद केलेली मिळकत ही श्री. चंद्रकांत जागनदास रोहीडा, रा. तासगाव यांचे मालकी वहिवाटीची असून सदरची मिळकत त्यांनी श्री. राजेंद्र कांचनलाल मेहता, रा. मिरज यांचेकडून खरेदी दस्त नं. २२१४/१९९७ ने ता. १५/५/१९९७ रोजी घेतलेली आहे. सदर खरेदीपत्रान्वये श्री. चंद्रकांत रोहीडा यांची नोंद सदर कलम १ मधील मिळकत रेकॉर्डला झाली आहे. वर कलम १ मधील मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजा विरहीत असलेची खात्री मिळकत मालक यांनी आमचे आशिल बँकेस दिली आहे. सदर वरील मिळकतीचा कर्जाचा प्रस्ताव आमचे आशिल बँकेकडे मिळकत मालक यांनी दिला आहे. सदर कर्जास वर कलम १ मधील मिळकत मालक यांनी सदरची मिळकत कर्जास तारण देणेचे निश्चित केले असून आमची आशिल बँक सदर कलम १ मधील मिळकत कर्जास तारण घेऊन कर्ज देणेचे विचारधीन आहे याकरिता सदरची जाहीर नोटीस देणेत येत आहे.

३) सबब या जाहीर नोटीसीने सर्वांना असे कळविणेत येते की, कलम मधील मिळकतीवर अन्य कोणतेही नोंद विनानोंद करार, लीज, लोन, भाडेकरार, भाडेपट्टा, तारण गहाण, शासकीय निमशासकीय बँका यांचे बोजे, कोर्ट केसेस, मिळकत तबदील होईल असे कोणतेही व्यवहार झाले असलेस सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाच्या आत खाली दिले पत्त्यावर कागदोपत्री लेखी आम्हास कळवावे व खात्री पटवून द्यावी. नोटीसीत दिले मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आलेस आमची आशिल बँक मुदतीनंतर इतर आवश्यक त्या कागदपत्रांचे पूर्ततेनंतर वर कलम १ मधील मिळकत कर्जास तारण घेऊन कर्ज देणेबाबत योग्य ती पूर्तता पूर्ण करतील तद्नंतर आमचे आशिल बँकेचा सदर मिळकतीवर अग्रहक्काने कायदेशीर बोजा निर्माण होईल. मुदतीनंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही यांची नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

सांगली
तारीख – १३/७/२०२४

**विजय द. सुतार – ॲडव्होकेट**
ऑफिस – १००/१, वखारभाग, सांगली, ता. मिरज,
जि. सांगली. मो. न. ९४०५५५६०३६

## थोडक्यात महत्त्वाचे




**कोल्हापूर : मातोश्री वृध्दाश्रमात आरोग्य शिबिरामध्ये वृध्दांची आरोग्य तपासणी करण्यात आली.**

### मातोश्री वृध्दाश्रमातील शिबीराचा शंभराहून अधिक वृध्दांचा लाभ

केसरी वृत्तसेवा

**कोल्हापूर :** रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर मिडटाऊन, मोरया हॉस्पिटल आणि दत्तकृपा क्लिनीकच्या पुढाकारातून, आर. के. नगर आणि चंबूखडी इथल्या मातोश्री वृध्दाश्रमात आरोग्य शिबिरामध्ये शंभरपेक्षा अधिक वृध्दांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच आवश्यकतेनुसार गरजू रूग्णांना मोफत औषधे देण्यात आली.कोल्हापुरातील आर. के. नगर इथल्या शिवाजी पाटोळे संचलित मातोश्री वृध्दाश्रम आहे. या वृध्दाश्रमाच्या अनेक अडचणी आहेत. वृध्दांच्या प्रकृतीच्या तक्रारींचं निवारण करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर मिडटाऊनच्या नूतन अध्यक्षा अरूंधती महाडिक यांच्या पुढाकारातून, आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. बाळकृष्ण शिंपुकडे, प्रतिभा शिंपुकडे, तसेच डॉ. सानिया धनवडे, निकिता जाधव यांच्या पुढाकारातून हे शिबिर पार पडले. वृध्दाश्रमाचे संचालक ॲड. शरद पाटोळे आणि शिवाजी पाटोळे यांनी वृध्दाश्रमाची उभारणी आणि अडीअडचणींबाबत माहिती दिली. यावेळी जयश्री चौधरी, बबन माने उपस्थित होते.

### अभयनगरमध्ये आज स्वच्छता मोहीमेचे आयोजन

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** केंद्र शासनाच्या सफाई ‘आप नावो बिमारी भगावो‘ या अभियानांतर्गत आज शनिवार दि. १३ जुलै रोजी सकाळी ७ वाजता अभयनगर दुधाळ शाळा रोड येथे स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली आहे. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे स्वच्छ सर्व्हेक्षण आणि माझी वसुंधरा अभियानाचे ब्रँड ॲम्बेसेडर दीपक चव्हाण यांनी या मोहिमेचे आयोजन केले आहे. सकाळी ७ ते ९ या वेळेत अभय नगर येथील महापालिकेच्या खुल्या भूखंडाची स्वच्छता केली जाणार आहे.

### अथणीमध्ये अमृत योजना कामाचा आज शुभारंभ

केसरी वृत्तसेवा

**अथणी :** कर्नाटक राज्य पाणीपुरवठा विभाग अंतर्गत ड्रेनेज बोर्डाद्वारे आणि पौराआढळीत निर्देशनालय यांच्या संयुक्तपणे अथणी शहरास २४ तास पाणीपुरवठा करणाऱ्या २.० अमृत योजना कामाचा शुभारंभ आज १३ जुलै रोजी सकाळी ११ वाजता माजी उपमुख्यमंत्री व आमदार लक्ष्मण सवदी यांच्या करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्य अभियंते संतोष कुलकर्णी यांनी अथणी येथे पत्रकारांशी बोलताना दिली. या कामासाठीए ११६ कोटी ४० लाखांचा निधी उपलब्ध झाला असून या योजनेमुळे अथणी शहरास २४ तास पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. त्यामुळे शहरातील पाणी समस्या तात्काळ दूर होणार आहे. हा कार्यक्रम चन्नम्मा सर्कल अथणी येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास राजकीय जनप्रतिनिधी, नगरसेवक, अधिकारी उपस्थित राहणार आहेत. तरी स्थानिक नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन सागर मगदूम यांनी केले आहे.


संतोष कुलकर्णी

### सनदी लेखापाल परीक्षेत श्रेया जाखोटियाचे यश

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** येथील श्रेया अजित जाखोटिया हिने सनदी लेखापाल परीक्षेत यश मिळवले. तिचे प्राथमिक शिक्षण कै. ग. रा. पुरोहित कन्या प्रशाला येथे तर गरवारे कॉलेज, पुणे येथे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. सनदी लेखापालची अंतिम परीक्षा नाशिक केंद्रावरून दिली होती. या परीक्षेत तिने यश मिळवले. या यशात आई–वडील शिक्षक यांचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन लाभले.


श्रेया जाखोटिया

### राष्ट्रीय छात्र सेनेचे अधिकारीपदी गजानन केरीपाळे यांची नियुक्ती

केसरी वृत्तसेवा

**कुरुंदवाड :** सीताबाई पटवर्धन हायस्कूलचे सहाय्यक शिक्षक गजानन केरीपाळे यांची राष्ट्रीय छात्र सेनेचे अधिकारी म्हणून नियुक्ती झाली. त्यांनी नागपूर येथील कामठी राष्ट्रीय ऑफिसर ट्रेनिंग अकॅडमी मध्ये निवासी सैन्य प्रशिक्षण घेतले आणि राष्ट्रीय छात्र सेनेचे अधिकारी ही पदवी प्राप्त केली. गजानन केरीपाळे यांनी कवायत, फायरिंग, नकाशा प्रशिक्षण, प्रथमोपचार, शारीरिक कवायतीचे प्रशिक्षण पूर्ण केले. मेजर जनरल कपिलजीत सिंग यांच्या उपस्थितीत पासिंग आउट परेडनंतर त्यांना असोसिएटेड राष्ट्रीय छात्रसेना ऑफिसर ही पदवी मिळाली. गजानन केरीपाळे यांना कोल्हापूर येथील ५६ महाराष्ट्र बटालियन राष्ट्रीय छात्रसेनेचे कर्नल पुनित गोगाई, हायस्कूलचे कमांडिंग ऑफिसर बाबासाहेब भुजगडे, मुख्याध्यापिका विनया जाधव यांचे मार्गदर्शन तर संस्थेच्या सचिव सीमा जमदग्नी, चेअरमन प्रा. शरद पराडकर यांचे प्रोत्साहन मिळाले.


गजानन केरीपाळे